निशाणी क्र.२५

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – अशोक कारभारी पुंड,

वय – ३९ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – जळके बु., ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरू–**

१. आरोपी आमच्या शेजारी राहत असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. घटना दिनांक ०६.०४.२०२४ रोजी आमच्या गावात हनुमान मंदीराजवळ सायंकाळी घडली. त्यावेळी मी मंदीराजवळ होतो. तेव्हा माझा आरोपींसोबत किरकोळ शाब्दीक वाद झाला होता. त्यामुळे मी पोलीसात फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. परंतु, त्यातील मजकूर मी वाचला नसल्यामुळे मला माहित नाही. असे काही घडले नाही की, आरोपी आदीनाथ याने मला शिविगाळ केली, आरोपी शुभम याने मला जमिनीवर पाडले व आरोपी बळीराम याने मला लोखंडी गजाने मारून फ्रॅक्चर केले तसेच आरोपी सुनिता हिने माझी पत्नी सुमन हिस खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०४.२०२४ रोजी रात्री ०८.०० वाजता मी हनुमान मंदीरासमोर असतांना आरोपी बळीराम दारू पिवून तेथे आला व काही कारण नसतांना मला शिविगाळ करू लागला. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याला समजावून त्याच्या घरी पाठवून दिले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आदीनाथ याने माझ्या पत्नीच्या फोनवर फोन करून शिविगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी व माझी पत्नी त्याला समजावून सांगण्यासाठी जात असतांना रस्त्यावर सर्व आरोपी तेथे

आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आदीनाथ याने मला शिविगाळ करण्यास सुरूवात केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शुभम याने मला जमिनीवर पाडले. हे म्हणणे खरे नाही की, बळीराम याने मला लोखंडी गजाने पाठीवर, पायावर, डोक्यावर व डाव्या हाताच्या कांबीवर मारून फ्रॅक्चर केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुनिता हिने माझी पत्नी सुमन हिस खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझा चुलत भाऊ प्रमोद पुंड व गावातील लोकांनी भांडण सोडवासोडव केली. हे म्हणणे खरे नाही की, मला मार लागला होता, चक्कर येत होती त्यामुळे मला पोलीस ठाण्यात नेले व तेथून ग्रामीण रुग्णालय नेवासा फाटा येथे नेले व तेथून मला सिव्हील हॉस्पीटल, अहमदनगर येथे पाठवले. हे म्हणणे खरे नाही की, हॉस्पीटलमधून सुट्टी झाल्यानंतर मी पोलीसात तक्रार दिली व त्यामध्ये मी वरीलप्रमाणे अधोरेखांकित भाग–अ सांगितला होता व तो मला वाचून दाखवल्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला आहे. सदरचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये का लिहिला याचे कारण मी सांगू शकत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यात आपसात तडजोड झालेली असून आम्ही वाद मिटवला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपींतर्फे ॲड. आर. यु. पागिरे यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा.

दिनांक–०७/०१/२०२६.